मी प्रेषितांना सल्लल्लाहु अलैही व सल्लम ना बघितले, त्यांनी सल्लल्लाहु अलैही व सल्लम नी लघवी केली त्यानंतर वुजु पुर्ण केला, आणी आपल्या मोजांवर मसा (ओला हात मोजा वरुन फिरविणे) केला

हजरत इब्राहिम नखई रहमहुल्लाह हम्माम बिन हारीस रहमहुल्लाह कडुन वर्णन करतात की: हजरत जरीर रजिअल्लाहु अनहु नी लघवी केली, त्यानंतर वुजु पुर्ण केला व आपल्या मोजावर मसा केला, लोकांनी त्यांना विचारले की:काय तुम्ही असे करता? ते म्हणाले:होय, मी प्रेषितांना सल्लल्लाहु अलैही व सल्लम ना बघितले, त्यांनी सल्लल्लाहु अलैही व सल्लम
नी लघवी केली त्यानंतर वुजु पुर्ण केला, आणी आपल्या मोजांवर मसा (ओला हात मोजा वरुन फिरविणे) केला. आमश रहमहुल्लाह सांगतात की: इब्राहिम रहमहुल्लाह नि सांगितले की:लोकांना हि हदिस फार आवडत असे, कारण हजरत जरीर रजिअल्लाहु अनहु यांनी ईस्लाम चा स्वीकार सुरह मायदा च्या अवतरणा नंतर केले होते. [صحيح] [متفق عليه]

हजरत जरीर बिन अब्दुल्ला रजिअल्लाहु अनहु नि लघवी केली मग वुजु पुर्ण केला, त्यानंतर पाय धुण्या ऐवजी आपल्या मोजांवर मसाअ (ओला हात फिरविला) केला, त्यावर तिथे उपस्थित लोकांनी आश्चर्याने विचारले:तुम्ही असे करत आहात?! त्यावर हजरत जरीर रजिअल्लाहु अनहु म्हणाले:मी प्रेषितांना सल्लल्लाहु अलैही व सल्लम ना असे करतांना बघितले आहे, प्रेषितांनी सल्लल्लाहु अलैही व सल्लम नी लघवी केली, मग वुजु पुर्ण केला, त्यानंतर मोजांवर मसाअ केला. हजरत जरीर रजिअल्लाहु अनहु चा ईस्लाम हा सुरह मायदा अवतरणा नंतर चा आहे, ज्यामध्ये वुजुबाबत सखोल माहिती देण्यात आली आहे, यावरुन माहित होते की, मोजांवर मसाअ या आयत मुळे रद्दबातल झाला नाही .

http://www.sunnah.global/hadeeth/mr/show/65378